आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

1. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात होणार मतदान.

2. विधान परिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ७ सदस्यांनी आज घेतली शपथ.

3. विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसद्वारा वरिष्ठ निरीक्षकांची नेमणूक; विदर्भात भूपेश बघेल, चरणजीत सिंह चन्नी आणि उमंग सिंघर पाहणार काम.

4. माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती आज सर्वत्र वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी.

निवडणूक कार्यक्रम

राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी बुधवारी मतदान होणार आहे. सर्व २८८ मतदारसंघात एकाच टप्प्यात मतदान होऊन शनिवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं आज केली. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकींची घोषणा करण्यासाठी आज केंद्रीय निवडणूक आयोगाने दुपारी नवी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषद घेऊन निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं. वेळापत्रक जाहीर झाल्याने राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी शहरी भागात कमी मतदान होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली .....

*Date of poll in Maharashtra would be 20th November. Counting would be on 23rd / 11/ 2024. And you will notice that date of poll is Wednesday. We have tried this mid- day deliberately so that issue of urban apathy is handled. And in case urban apathy we are really very concerned. We want to make appeal through you to all the esteemed voters in the urban areas to please come and vote. It’s not a healthy trend that is reflecting.*

मंगळवार दिनांक २२ ऑक्टोबरला निवडणुकीची अधिसूचना जाहीर होईल, तर २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येतील. ३० ऑक्टोबरला छाननी होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. निवडणूकांच्या घोषणे नंतर सर्व जिल्ह्याधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेतला असून नागरिकांना मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन केलं आहे. दरम्यान, झारखंडमध्ये २ टप्प्यांत १३ नोव्हेंबर आणि २० नोव्हेंबर रोजी मतदान होईल, तर मत मोजणी २३ नोव्हेंबरला होणार आहे.

मोदी दूरसंचार

दूरसंचार आणि संबंधित तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारत वेगाने पुढे जाणाऱ्या देशांपैकी एक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आंतरराष्ट्रीय दूरसंचार महासंघ जागतिक दूरसंचार मानकीकरण परिषद २०२४ चं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. भारतात १२० कोटी मोबाइल फोन वापरकर्ते, ९५ कोटी इंटरनेट वापरकर्ते आणि जगातले ४० टक्क्यांहून अधिक रिअल-टाइम डिजिटल व्यवहार होतात, असं पंतप्रधानांनी सांगितलं. या कार्यक्रमात यावर्षीच्या आठव्या इंडिया मोबाईल काँग्रेस २०२४ चं ही उद्घाटन करण्यात आलं.

शपथविधी

विधान परिषदेवरत  राज्यपाल नियुक्त ७ सदस्यांनी आज शपथ घेतली. यामध्ये चित्रा वाघ, विक्रांत पाटील, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांचा समावेश आहे. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात या सर्वांना सदस्यत्वाची शपथ दिली. विधान परिषदेवरच्या राज्यपालनियुक्त ५ जागा अजून रिक्त आहेत. दरम्यान, या नियुक्त्यांना विरोध करणाऱ्या याचिकेवर आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ही याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी न्यायालयाने निकाल राखून ठेवलेला असताना या नियुक्त्या केल्याचं या याचिकेत म्हटलं आहे. मात्र, राज्यपाल निर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीला कोणत्याही प्रकारची हंगामी स्थगिती नव्हती किंवा सरकारनेही या नियुक्त्या करणार नाही अशी हमी दिली नव्हती. त्यामुळे १२ रिक्त जागांपैकी ७ आमदारांची नियुक्ती केल्याची माहिती राज्य सरकारने उच्च न्यायालयात दिली आहे. या प्रकरणी अंतिम निर्णय देताना याबाबत मत नोंदवू, असं उच्च न्यायालयानं आजच्या सुनावणीत सांगितलं.

काँग्रेस उमेदवारांच्या मुलाखती/निरीक्षक

विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज अखिल भारतीय काँग्रेस समितीचे वरिष्ठ निरीक्षक आणि वरिष्ठ निवडणूक समन्वयकांची नेमणूक केली आहे.विदर्भात भूपेश बघेल, चरणजीत सिंग आणि उमंग सिंगर यांची नेमणूक करण्यात आली आहे तर मुंबई आणि कोकण प्रांतासाठी अशोक गेहलोत आणि डॉक्टर जी परमेश्वरा तर मराठवाड्यासाठी सचिन पायलट आणि उत्तम कुमार रेड्डी हे निरीक्षक असतील पश्चिम महाराष्ट्रासाठी टी एस सिंगदेव आणि एम बी पाटील तर उत्तर महाराष्ट्रासाठी डॉक्टर सईद नासिर हुसेन आणि डी अनसूया सिथका यांची वरिष्ठ निरीक्षक म्हणून काँग्रेसने येत्या विधानसभा निवडणुकांसाठी नियुक्ती केली आहे. तर, मुकुल वासनिक आणि अविनाश पांडे समन्वयक म्हणून काम पाहतील. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज नागपुरात काँग्रेस पक्षातर्फे नागपुर शहारातील 6 विधानसभा मतदार संघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यास सुरुवात झाली आहे. नागपुरात काँग्रेस पक्षातर्फे सर्व 6 जागा लढविल्या जाणार असल्याचं शहर अध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांनी सांगितलं. शहरातील 6 मतदासंघात तब्बल 71 उमेदवारांनी दावा केला आहे. मात्र ज्यांना तिकीट नाकारण्यात येईल त्यांनी बंडखोरी केल्यास ते खपवून घेतलं जाणार नाही अशी तंबी विकास ठाकरे यांनी नाराज कार्यकर्त्यांना दिली आहे.

काँग्रेस पत्रकार परिषद

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि महाविकास आघाडी सज्ज आहे. तिजोरीत पैसा नाही, आणि निधीची तरतूद नसताना मागील दोन महिन्यात युती सरकारने केवळ जनतेची दिशाभूल करणाऱ्या घोषणा केल्या आहेत. विधानसभा निवडणुका नजरेसमोर ठेवून केलेले हे चुनावी जुमले असून जनतेनं या जुमलेबाजीला फसू नये आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी मविआलाच विजयी करावं, असं आवाहन काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केलं आहे. नाशिक येथील पत्रकार परिषदेत चेन्निथला यांनी राज्यातील विद्यमान महायुती सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप देखील केले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुंबईतील पाच टोल नाक्यावरील टोल माफीचा निर्णय संपूर्ण महाराष्ट्राला का लागू करण्यात आला नाही असा प्रश्न उपस्थित केला.

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती

देशाचे अकरावे राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन अशी ओळख असणारे भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची जयंती आज साजरी होत आहे. हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली

आहे. अब्दुल कलाम यांची दूरदृष्टी आणि विचार विकसित भारताच्या संकल्पपूर्तीमध्ये महत्त्वाचं योगदान देत असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.'डॉ.कलाम हे उत्तम साहित्यिक होते. मुलांनी डॉ.कलाम यांचे कार्य आणि अग्निपंख पुस्तकातून प्रेरणा घेवून सक्षम वैज्ञानिक बनावं, असं प्रतिपादन शालेय शिक्षण तथा मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी केलं. 'वाचन प्रेरणा दिना' निमित्त मराठी भाषा विभागातर्फे मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. वाचन प्रेरणा दिनानिमित्त आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासह अनेक सरकारी आस्थापनांमध्ये आणि संस्थांमध्ये डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहण्यात आली. याशिवाय आज सायंकाळी 6 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय आणि भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने, विदर्भ साहित्य संघ इथं 'विदर्भ, माझ्या मातीतील लेखक आणि माझा वाचन प्रवास' या विषयावर मुंबईचे लेखक प्रा. अविनाश कोल्हे यांचं व्याख्यान आयोजित करण्यात आलं आहे.

<u>दया पवार स्मृति पुरस्कार</u>

साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात दिला जाणारा पद्मश्री दया पवार स्मृति पुरस्कार यंदा ज्येष्ठ लेखिका प्रा. आशालता कांबळे, लेखक शाहू पाटोळे, पत्रकार सुकन्या शांता यांना जाहीर झाला आहे. दया पवार प्रतिष्ठानतर्फे गेल्या पाच वर्षांपासून चर्चेत असलेल्या आत्मकथनांना ग्रंथाली पुरस्कृत 'बलुतं' पुरस्कार देण्यास सुरूवात झाली असून यंदाच्या 'बलुतं' पुरस्कारासाठी विदर्भातील ज्येष्ठ लेखिका अरुणा सबाने यांना 'सूर्य गिळणारी मी' या आत्मकथनासाठी हा पुरस्कार देण्यात येणार आहे. अरुणा सबाने गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ स्त्रीवादी जाणिवांना प्रत्यक्ष चळवळीच्या पातळीवर कामाचं परिमाण मिळवून देणाऱ्या कथा-कादंबऱ्या आणि वैचारिक लेखन-संपादन करत आहेत. तर लेखक शाहू पाटोळे यांनी दलितांच्या खाद्य इतिहासाबाबत "अन्न हे अपूर्णब्रह्म" हे पुस्तक लिहिलं असून हे पुस्तक इंग्रजीत 'दलित किचन्स ऑफ मराठवाडा' या नावाने प्रकाशित झालं आहे. पाटोळे हे भारतीय माहिती सेवेतील निवृत्त अधिकारी असून त्यांनी आकाशवाणी आणि दूरदर्शनसारख्या संस्थांमध्ये काम केलं आहे.२० ऑक्टोबर रोजी मुंबई इथं लोकशाहीर संभाजी भगत यांच्या अध्यक्षतेखाली दया पवार स्मृती पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. यंदाचा हा २६ वा पुरस्कार सोहळा असून प्रत्येकी दहा हजार रुपये रोख आणि चित्रकार शांताराम पवार यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेले सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

******